मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP ) च्या संबंधातील झोपडपट्टी निर्मुलन/ पुनर्वसनाबाबतच्या तरतुदी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP ) या प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांना लागु करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
शासन निर्णय क्र. पर्यायी २००५/प्र.क्र.१०७/झोपनि-२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १४ नोव्हेंबर, २००५

वाचा:- शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांक प्रकल्प १७००/ सीआर ३१/स्लम-२, दिनांक १२ डिसेंबर, २०००.

प्रस्तावना:

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत शहराच्या विकासासाठी मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) आणि मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी ) हे दोन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांतर्गत पूर्व आणि पश्चिम द्रुतगतीमार्ग, जोगेश्वरी- विक्रोळी जोड रस्ता, अंधेरी- घाटकोपर जोडरस्ता इत्यादिंचे रुंदीकरण आणि नुतनीकरणाचे काम सुरु आहे. या विकास कामांमुळे असंख्य झोपडया/ मालमत्ता बाधित होत असून अशा पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे ही प्रकल्प राबविणाऱ्या संस्थेची जबाबदारी आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरुवातीला मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) राबविण्यात येत होता. या प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनासाठी शासनाने संदर्भात नमुद केलेल्या दि. १२ डिसेंबर, २००० च्या शासन निर्णयानुसार एक विशेष पुनर्वसन धोरण जाहिर केले आहे. सदर धोरणानुसार (एमयुटीपी) प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्प ग्रस्तांना शासनाचे झोपडपट्टी पुनर्वसन विषयक सर्वसाधारण धोरण लागू न करता सामाजिक व आर्थिक पायाभूत सर्वेक्षणात पात्र ठरलेल्या प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे धोरण लागू करण्यात आले आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाला (एमयुटीपी) पूरक म्हणून मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे एमयुटीपी प्रमाणेच मोठया प्रमाणावर झोपडया बाधित होत आहेत. सद्यस्थितीत या प्रकल्पासाठी शासनाचे प्रचलित धोरण लागू करण्यात येत असून १.१.१९९५ पर्यंतच्या झोपडीधारकांना पर्यायी जागा

मिळण्यास पात्र ठरविण्यात येत आहे. दोन प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासियांच्या पात्रतेविषयी एकसुत्रता आणून करुन मुंबई शहराच्या विकास कामाला गती देणे जरुरीचे आहे. या संबंधाने पुनर्वसनाबाबतचे एमयुटीपी बिषयक धोरण एमयुआयपी प्रकल्पांतर्गत विकास कामामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांना सुध्दा लागु करावे किंवा कसे ही बाब शासनाच्या विचाराधिन होती. प्रस्तुत बाबींचा सर्वांगीण विचार करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे:-

## शासन निर्णय:

संदर्भात नमुद केलेल्या शासन निर्णयाअन्वये मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे (एमयुटीपी) बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. आता मुंबई नागरी परिवहन प्रकल्पा बरोबरच मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) कार्यान्वीत करण्यात आला आहे. यास्तव मुंबई नागरी प[illegible]हन प्रकल्पामुळे (एमयुटीपी) बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबतचे धोरण मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठीसुध्दा (एमयुआयपी) लागू करण्यात येत आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदी फक्त सन २००० पर्यंतच्या झोपडयांच्या बाबतीत लागू होणार आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( एन्. रामाराव )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राज भवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री ( महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री ( गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री ( नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. राज्यमंत्री ( महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८ मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

39/43 (179)

९. मा. महाअधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
१०. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
११. प्रधान सचिव (१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव ( विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
१५. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई
१६. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई-५१
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो. पु. प्रा, मुंबई-५१
१८. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, मुंबई
१९. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई
२०. अध्यक्ष, स्पार्क
२१. अतिरिक्त जिल्हाधिकारी ( मुंबई शहर/ पूर्व उपनगरे /पश्चिम उपगरे)
२२. निवड नस्ती, झोपनि-२, गृहनिर्माण विभाग

Document1 svs/pc

(13)